## महत्त्वाचे

### घुमरीचे सरपंच, सदस्याचे पद रद्द

**कर्जत (प्रतिनिधी)**– तालुक्यातील घुमरी गावच्या सरपंच व सदस्यांनी कुटुंबातील सदस्याच्या नावे ग्रामपंचायत खात्यातील रक्कम काढून शासकीय रकमेचा अपहार केल्याप्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम १४ (ग) नुसार सरपंच संगीता संजय अनभुले व सदस्य मंदाबाई रमेश अनभुले यांचे पद जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी रद्द केले आहे. सरपंच संगीता अनभुले व ग्रामपंचायत सदस्य मंदाबाई अनभुले यांनी आपल्या मुलांच्या नावे शासकीय रकमांचे धनादेश काढून अपहार केल्याची तक्रार जिल्हा परिषदेचे उपकार्यकारी अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत सदस्यांनी केली होती.

# शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया; पाथर्डीत विविध विभागांची आढावा बैठक

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)** – केंद्र आणि राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून सर्वसामान्य नागरिकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी सूचना जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी अधिकाऱ्यांना दिली.

नव्याने जिल्हाधिकारीपदाचा कार्यभार स्वीकारलेले डॉ.पंकज आशिया बुधवारी (दि.४) पाथर्डी तालुक्याच्या दौऱ्यावर होते. त्यांनी विविध शासकीय विभागांची आढावा बैठक घेतली. पाथर्डी तहसील कार्यालयात झालेल्या या बैठकीत त्यांनी महसूल, पोलिस, सार्वजनिक बांधकाम, नगरपरिषद, भूमिअभिलेख, कृषी, पंचायत समिती आदी विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक तसेच इतर खात्यांचे प्रमुख अधिकारी व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सर्व खात्यांचे काम स्वतंत्रपणे तपासून अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधण्यात आला. जिल्हाधिकारी आशिया यांनी ई-हक्क प्रणाली, प्रधानमंत्री आवास योजना, जल जीवन मिशन, मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, उज्ज्वला योजना, आयुष्मान भारत योजना, स्वच्छ भारत मिशन यासारख्या महत्त्वाच्या योजनांची प्रगती जाणून घेतली. यावेळी त्यांनी अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी पाथर्डी नगरपरिषदेच्या नव्या प्रशासकीय इमारतीची पाहणी करून मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्याकडून कामकाजाची माहिती घेतली आणि आवश्यक सूचना केल्या. पुढील बैठकीत याच योजनांच्या प्रगतीचा आढावा घेऊन कार्यपद्धतीत सुधारणा सुचवण्यात येतील, असे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सांगितले.



पाथर्डी शहरातील नगरपरिषदेच्या नूतन प्रशासकीय इमारतीच्या कामाची पाहणी करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया. (छाया – नारायण पालवे)

### पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे दोन दिवसांत पूर्ण होणार

- जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीचे पंचनामेही जवळजवळ पूर्ण झाल्याचे सांगितले. उर्वरित २० टक्के पंचनामे पुढील दोन दिवसांत पूर्ण करून शासनाकडे अनुदानासाठी प्रस्ताव पाठवण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या दौऱ्याने पाथर्डी तालुक्यातील प्रशासकीय कामकाजाला गती मिळण्याची अपेक्षा आहे.

# पाथर्डी पंचायत समितीचा जिल्ह्यात प्रथम क्रमांक

### घरकुल योजना प्रभावीपणे राबविल्याबद्दल पुरस्कार प्रदान



**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)**– महाआवास अभियान, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) विभागात घरकुल योजना तालुक्यात प्रभावीपणे राबवून यशस्वी केल्याबद्दल ग्रामीण विभागाच्या जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार पाथर्डी पंचायत समितीला आज पुण्यामध्ये समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. अशा स्वरूपाचा पुरस्कार पंचायत समितीला प्रथमच मिळाल्याने कर्मचाऱ्यांसह नागरीकांनी आनंदोत्सव साजरा केला.

मंगळवारी (दि.३) सायंकाळी पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन २०२२, २०२३ या वर्षाच्या कामासाठी प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे, तत्कालीन गट विकास अधिकारी डॉ. जगदीश पालवे, विस्तार अधिकारी दत्तात्रय रानमळ, अभियंता प्रकाश पालवे, विनोद वारे व ग्रामविकास अधिकारी म्हस्के यांनी हा पुरस्कार स्वीकारला. गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे म्हणाले, दोन वर्षांपूर्वी झालेल्या घरकुलांच्या कामाबाबत तालुक्यात सर्वाधिक व दर्जेदार काम झाले आहे. ग्रामीण भागातील गरजू लोकांसाठी आवास योजनेची प्रभावी व दर्जेदार अंमलबजावणी करण्यात सर्व अधिकारी, कर्मचारी विशेषतः तत्कालीन गटविकास अधिकारी डॉ. पालवे यांचेही योगदान आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार मोनिका राजळे व आमदार शिवाजीराव कर्डिले यांचेही मार्गदर्शन लाभले. प्रथम क्रमांकाच्या पुरस्काराने संपूर्ण तालुक्याचा गौरव झाला आहे. चांगल्या कामाची दखल घेत शासनाने केलेला गौरव कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन व प्रेरणादायी ठरणार आहे.

# पारनेरमध्ये फिल्मी स्टाईल थरार

## दोन कैद्यांकडून एकाला बेदम मारहाण

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)** – पारनेर पोलिस ठाण्याच्या लॉकअपमध्ये दोन कैद्यांनी एका कैद्याला फिल्मी स्टाईल बेदम मारहाण केली. या घटनेत कैद्याचा दात पडून गंभीर दुखापत झाली आहे. ही घटना बराक क्र. ४ मध्ये सोमवारी (दि.२) रात्री पावणे अकरा वाजेदरम्यान घडली.

कैदी सुभाष बबन करगळ (वय ३५, रा. गाजदीपूर, ता. पारनेर) याने पारनेर पोलिस ठाण्यात याबाबत फिर्याद दिली आहे. फिर्यादी हा विनयभंग आणि पोक्सोच्या गुन्ह्यात पोलिस लॉकअपमधील बराक क्र. ४ मध्ये न्यायालयीन कोठडीत बंदी आहे. त्याच बराकमध्ये त्याच्या पूर्वीपासून एका गुन्ह्यात प्रणय अरविंद खंडागळे (वय २०, रा. सुपा, ता. पारनेर) आणि ऋषिकेश गणेश खामकर (वय २१, रा. पानोली, ता. पारनेर) हे दोघे न्यायालयीन कोठडीत आहेत. या दोघांनी २ जून रोजी रात्री १०.४५ च्या सुमारास सुभाष करगळ यास बाथरूम घासायला लावले. त्यावरून त्यांच्यात वाद झाले. त्यामुळे या दोघांनी करगळ यास लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तोंडावर बुक्क्यांनी मारल्याने त्याचा एक दात पडला. तसेच तो जखमी झाला. हा प्रकार लॉकअप गार्ड नेमणुकीस असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी सुभाष करगळ याची दोघांच्या तावडीतून सुटका केली. याबाबत सुभाष करगळ याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी प्रणय खंडागळे व ऋषिकेश खामकर या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# भरदिवसा महिला दुकानदाराचे दागिने ओरबडले

## कर्जत तालुक्यातील कोरेगाव येथील घटना

**कर्जत (प्रतिनिधी)**– तालुक्यातील कोरेगाव येथे शिवदत्त किराणा अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स या दुकानांमध्ये भर दिवसा दुपारी चार वाजण्याच्या सुमारास दोन चोरट्यांनी पाण्याची बॉटल खरेदी करण्याचे निमित्त करत महिला दुकानदाराच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरून नेले. ही घटना सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाली आहे.





घटनेबाबत माहिती अशी, कर्जत तालुक्यातील कोरेगाव येथील श्री दत्त किराणा अ‍ॅड जनरल स्टोअर्स या दुकानांमध्ये मंगळवारी (दि.३) दुपारी चार वाजता रोहिणी रवींद्र शेळके या महिला दुकानदार दुकानामध्ये होत्या. त्यावेळी दुचाकीवर दोन चोरटे तोंडाला रुमाल बांधून दुकानामध्ये आले. त्यांनी पिण्याच्या पाण्याची बॉटल मागितली. पाण्याची बॉटल खरेदी करण्यासाठी चोरट्याने पन्नास रुपये दिले. सुट्टे पैसे परत देत असताना चोरट्याने रोहिणी शेळके यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने ओरबडले आणि साथीदाराच्या गाडीवर बसून पळून गेला. ही घटना घडताच महिला दुकानदार शेळके यांनी जोरजोरात आरडाओरड केली. यावेळी दुकानाच्या बाहेर एक वृद्ध आजी बसल्या होत्या. त्या देखील ओरडल्या. आवाजाने आसपासचे नागरिक त्या ठिकाणी जमा झाले. मात्र तोपर्यंत चोरटे पसार झाले होते. याप्रकरणी कर्जत पोलीस स्टेशनमध्ये दोन अज्ञात चोरट्यांवरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुकानचे चालक रवींद्र शेळके हे कर्जत येथे काही कामानिमित्त आलेले असताना ही घटना घडली. या घटनेने खळबळ उडाली असून महिलांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

# बकरी ईद शांततेत व सौहार्दपूर्ण वातावरणात साजरी करा

## पोलिस निरीक्षक मुटकुळे; पाथर्डीत शांतता समितीची बैठक

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)**– बकरी ईद शांततेत व सौहार्दपूर्ण वातावरणात साजरी करा, असे आवाहन पाथर्डी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मुटकुळे यांनी केले. बकरी ईद शनिवारी (दि.७) साजरी होणार आहे.

पाथर्डी तालुक्यात बकरी ईद सणानिमित्त मंगळवारी (दि.३) सायंकाळी पाथर्डी पोलीस ठाण्यात मुस्लिम समाज बांधव आणि मौलाना यांच्या उपस्थितीत शांतता समितीची बैठक पार पडली. या बैठकीत गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच कुर्बानीसाठी संरक्षित जागेचा वापर करण्याचे आणि कोणत्याही समाजाच्या धार्मिक भावना दुखावणार नाही याची खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष नासिर शेख, मौलाना मन्सूर पठाण आदी उपस्थित होते.

पोलिस निरीक्षक मुटकुळे म्हणाले, बकरी ईद हा सण सर्वांनी मिळून आनंदाने साजरा करावा. यासाठी कोणत्याही प्रकारे सामाजिक तणाव निर्माण होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. कुर्बानीसाठी वापरण्यात येणारी जागा स्वच्छ आणि संरक्षित असावी तसेच खुल्या जागेत कुर्बानी न करण्याची सूचना केली. सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करून इतर समाजाच्या धार्मिक भावनांचा आदर राखला जावा, बकरी ईद सणादरम्यान तालुक्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासन सज्ज आहे. कोणत्याही प्रकारच्या अनुचित प्रकाराला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.



बैठकीत उपस्थित सर्वांनी शांतता आणि सौहार्द राखण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. मौलाना मन्सूर पठाण यांनी समाजातील सर्वांनी एकत्र येऊन सण साजरा करण्याचे आवाहन केले. काँग्रेस तालुकाध्यक्ष नासिर शेख यांनीही सामाजिक एकतेचा संदेश देताना सर्व समाजबांधवांना सणाच्या शुभेच्छा दिल्या. बैठकीत उपस्थित सर्वांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याची ग्वाही दिली. यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवाजी तांबे आणि गुप्तवार्ता विभागाचे नागेश वाघ उपस्थित होते.

# तिसगाव येथील गोरक्षकाला मारहाण करणारे दोघे जेरबंद

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)** – तालुक्यातील तिसगाव येथील गोरक्षकाला मारहाण प्रकरणातील दोन मुख्य आरोपींना पाथर्डी पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर येथून जेरबंद केले, शाकीर सलीम कुरेशी (वय २४), इरफान फैजु कुरेशी (वय ३३, दोन्ही रा.तिसगाव, ता.पाथर्डी) अशी ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत.

गोरक्षक भारत लिपारे (वय ३९) यांच्यावर ९ जणांच्या टोळक्याने हल्ला करून मारहाण केल्याची धक्कादायक घटना २९ मे ला घडली. या हल्ल्यात लिपारे यांची दीड तोळ्याची सोन्यांची चैन आणि आठ हजार पाचशे रुपयांची रोख रक्कम लुटण्यात आली. तसेच, हल्लेखोरांनी लिपारे यांचे हात-पाय बांधून त्यांना जीवे मारण्याची धमकी देऊन तलवारीसह लाकडी दांडके, बेल्ट, फायटरणे मारहाण केली. लपारे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार या प्रकरणी पाथर्डी पोलीस स्टेशनमध्ये ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी पसार आहेत. त्यापैकी दोन आरोपी छत्रपती संभाजीनगर येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानूसार पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर येथील सिल्लेखान परिसरातून शाकीर कुरेशी, इरफान कुरेशी या दोघांना ताब्यात घेतले व पाथर्डी पोलीस ठाण्यात हजर केले. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अनंत सालगुडे व पोलीस अंमलदार सुरेश माळी, फुरकान शेख, सागर ससाणे, विशाल तनपुरे, किशोर शिरसाठ, प्रशांत राठोड व भगवान धुळे यांच्या पथकाने केली. पुढील तपास पाथर्डी पोलीस स्टेशन करीत आहे.

# प्राचार्य डॉ. नगरकर पुरस्काराने सन्मानीत




**कर्जत (प्रतिनिधी)**– येथील दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर संजय नगरकर यांना विश्वबंधुता भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

विश्वबंधुता साहित्य परिषद पुणे, रयत शिक्षण संस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध आणि काषाय प्रकाशन, पुणे या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने सातवा विश्वबंधुता काव्य महोत्सव नुकताच एस. एम. जोशी सभागृह, पुणे येथे पार पडला. या संमेलनामध्ये प्राचार्य नगरकर यांना प्रतिष्ठेचा विश्वबंधुता पुरस्कार विश्वबंधुता साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रकाश रोकडे, प्रा. चंद्रकांत वानखेडे, संगीता झिंजुरके, कॉ.अजित अभ्यंकर, प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, प्रा. भारती जाधव यांच्या उपस्थितीमध्ये प्रदान करण्यात आला.

या पुरस्काराबद्दल रयत शिक्षण संस्थेचे सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राजेंद्र फाळके, आमदार रोहित पवार, रयत शिक्षण संस्थेचे सदस्य अंबादास पिसाळ, महाविद्यालय विकास समिती सदस्य बप्पाजी धांडे, राजेंद्र निंबाळकर आदींनी प्राचार्य नगरकर यांचे अभिनंदन केले आहे.

# शेवगावच्या खंडोबा मैदानावर कुस्तीचा थरार

## देवाभाऊ स्पर्धेचे उद्घाटन; २५० पेक्षा अधिक मल्लांचा सहभाग

**शेवगाव (तालुका प्रतिनिधी)** – येथे देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेचे उदघाटन तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री, राम महाराज झिंजुर्के व रेणुका मल्टीस्टेटचे अध्यक्ष प्रशांत भालेराव यांच्या हस्ते बुधवारी (दि.४ जून) करण्यात आले. अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ, शेवगाव तालुका तालीम संघ आणि वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कुस्ती स्पर्धेत नगर जिल्ह्यासह राज्यातील २५० पेक्षा अधिक कुस्तीपटू सहभागी झाले आहेत.

शेवगावच्या खंडोबा मैदानावर कुस्तीचा थरार रंगला असून, पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी पहिल्याच दिवशी कुस्ती पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती. या उद्घाटन सोहळ्यासाठी ज्ञानेश्वर महाराज बटूळे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा या स्पर्धेचे आयोजक अरुण मुंढे, जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष वैभव लांडगे, खजिनदार नाना डोंगरे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, जगदीश धूत, विहीपचे वंजारी, नंदू मुंढे, तुषार वैद्य, अमोल सागडे, डॉ. कृष्णा देहाडराय, एकनाथ कुसळकर, अंकुश कुसळकर, मगर कडू, कमलेश गांधी, दिगंबर काथवटे, माजी उपनगराध्यक्ष वजीर पठाण, विक्रम बारवकर, दिपक डावखर, रमेश दारकुंडे, विनोद मोहिते, सालार शेख, माऊली खेडकर, बाळासाहेब कोळगे, एकनाथ शिरसाठ, गणेश गर्जे, उदय मुंढे, सुनील जगताप, क्रीडा अधिकारी भाऊसाहेब वीर, माजी सैनिक विनोद शेळके, पप्पू केदार, अंकुश ढाकणे, सोमा मोहिते, अभी बडे, अंबू पहिलवान, प्रकाश चित्ते आदी मान्यवर उपस्थित होते.





- प्रशांत भालेराव यांनी स्पर्धेला शुभेच्छा दिल्या व शेवगाव तालुक्यात विविध क्रीडा स्पर्धांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. राम महाराज झिंजुर्के यांनी तरुणांनी शरीर संपदा कमविण्यासाठी व्यायाम केला पाहिजे. कुस्तीने मन व शरीर सदृढ बनते. निरोगी आरोग्यासाठी कुस्ती खेळ खेळण्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात अरुण मुंढे म्हणाले, राजकारणात आल्यानंतर खेळाकडे दुर्लक्ष झाले, मात्र खेळाडूवृत्तीचा पिंड सोडला नाही. वंदे मातरम क्रीडा मंडळाच्या माध्यमातून युवकांना व्यायामाची आवड निर्माण होण्यासाठी व त्यांना दिशा देण्यासाठी व्यायामशाळा व कुस्ती संकुल उभारले. त्याचे उद्घाटन सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणात या कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत एक पंजाब केसरी तर तीन महाराष्ट्र केसरी एकाच आखाड्यात उतरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी पहेलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात जीव गेलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत व संतपूजन नंदूभाऊ मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले. पाहुण्यांचा पगडी घालून सन्मान करण्यात आला. आखाडा व बजरंग बलीच्या प्रतिमेचे पूजन करुन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कुस्ती लावून या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

आदिनाथ महाराज शास्त्री म्हणाले, पैलवान मुलांमध्ये व वस्तादात हनुमानजीचे रुप दिसते. आपल्या संस्कृतीतील कुस्ती खेळाला चालना देण्यासाठी घेण्यात आलेला उपक्रम कौतुकास्पद आहे.

कुस्तीचे समालोचन हंगेश्वर धायगुडे यांनी केले. पंचप्रमुख रवी बोचरे यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्त्या पार पडत आहेत.